समान धर्माच्या धाग्याने एकत्र आणून त्यांना स्वराज्याचा, स्वधर्माचा संदेश शिवाजी महाराजांनी दिला व मुस्लिम राजवटीविरुद्ध मराठ्यांना एकत्र आणले.'' **ग्रँट डफने** म्हटले आहे, ''देश जिंकण्यासंबंधात मराठे हे आमचे पूर्वज असून त्यांची सत्ता हळूहळू बळाने वाढत असता त्यांना दिगंतकीर्तीचा शिवाजी भोसले हा नेता लाभला.'' शौर्य, धैर्य, साहस, दूरदृष्टी, संघटनकौशल्य, प्रचंड शक्ती, अन्यायाविरुद्ध चीड इ. गुण शिवाजी महाराजांच्या अंगी होते. हेच गुण इतर मराठा सरदारांतही काही प्रमाणात होते. पण त्या गुणांचा स्वराज्यस्वातंत्र्य संपादनासाठी उपयोग करून घेणारे शिवाजी महाराज हे एकच होऊन गेले. **न्या. महादेव गोविंद रानडे** लिहितात, ''ज्या समाजात व काळात शिवाजी जन्मास आला त्या समाजाच्या व काळाच्या ज्या सर्वोत्तम आशाआकांक्षा होत्या त्यांची जाणीव आपल्या व्यक्तिमत्त्वामध्ये उभी करणारा असा तो (शिवाजी) पुरुष होता व यातच त्याचे खरे बळ साठविलेले होते. मराठी सत्तेचा उदय झाला तेव्हा ज्या व्यक्ती आपल्या कर्तृत्वाने झळकत होत्या त्या सर्वांचा राष्ट्रनिर्मितीच्या कामासाठी शिवाजी महाराजांनी उपयोग करून घेतला.''

**शहाजी भोसले व त्यांची कामगिरी :-**

बहामनी साम्राज्यात व विशेषत: त्याची ५ शकले (शाह्या) झाल्यानंतर काही हिंदू कुटुंबांना विशेषत: मराठ्यांना आपले कर्तृत्व दाखविण्याची संधी प्राप्त झाली. काही कुटुंबांनी कारकुनापासून सरकारकूनापर्यंत तर काही कुटुंबांनी शिपायापासून ते सरलष्करापर्यंत मजल मारली. अशा कुटुंबापैकी वेरूळचे भोसले हे एक कुटुंब होय.

**भोसले घराण्याचा उदयपूरच्या सिसोदे घराण्याशी संबंध** होता अशी माहिती अनेक बखरींत आलेली आहे. छत्रपतींनी विवाह व इतर प्रसंगी उदयपूरच्या सिसोदे घराण्याला निमंत्रणे पाठविली होती. हे जरी खरे असले तरी भोसले वंशाचा सिसोदे वंशाशी जो संबंध आहे त्याबाबत निश्चित पुरावा उपलब्ध नाही. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकप्रसंगी भोसले वंशाचा संबंध राजस्थानातील सिसोदे वंशाशी जोडण्याचा प्रयत्न गागाभट्टाने केला होता. इतिहासकार **कै. ग. ह. खरे** हे सिसोदे व भोसले या दोन घराण्यांचा संबंध होता हे मानावयास तयार नव्हते.

**१) मालोजी भोसले :-** शहाजींच्या पित्याचे नाव मालोजी भोसले, तर आजोबाचे नाव बाबाजी भोसले. शिवभारत व राधामाधव-विलासचंपू या ग्रंथात मालोजी भोसलेंपासूनची माहिती उपलब्ध आहे. फलटणच्या निंबाळकर घराण्यातील मुलीशी

Scanned with OKEN Scanner

मालोजींचे लग्न झाले होते. मालोजींचा जन्म केव्हा झाला हे सांगता येत नाही. पण त्यांची आनुवंशिक पाटीलकी व देशमुखी वतने वेरूळच्या आसपास व भीमा नदीच्या दोन्ही तीरांवरील दौंडपासून पुढील १० कोसांच्या अंतरात होती. मालोजी हा निजामशाहीचा मनसबदार होता. पण त्याची मनसब किती मोठी होती त्याबद्दल निश्चित पुरावा नाही.

मालोजी भोसलेंना दोन पुत्र होते.

१. शहाजी (जन्म १५९९)

२. शरीफजी

शहारारीफ नावाच्या मुस्लिम साधूच्या कृपेने हे दोन पुत्र झाले म्हणून त्यांची नावे अशी ठेवली होती.

मालोजी १६०६ मध्ये मृत्यू पावले. निजामशहाच्या आज्ञेने मालोजी भोसले यांनी इंदापूरवर स्वारी केली होती व त्यात ते मृत्यू पावले. मालोजी यांनी भोसले यांचे कुलदैवत शिखर शिंगणापूरचा शंभू महादेव येथे तलाव बांधून पिण्याच्या पाण्याची सोय केली. त्याशिवाय वेरूळ येथे घृष्णेश्वराजवळ उत्तम पाण्याची विहीर बांधली. त्याशिवाय औरंगाबादेत मालपुरा, परसपुरा, विठपुरा व खेलपुरा ही पुरे वसवले. ही सर्व पुरे मालोजी, विठोजी, परसोजी, खेळोजी या भोसले कुळातील व्यक्तींच्या नावावरून वसवली होती. ही बाब विचारात घेण्याजोगी आहे. मालोजीच्या पराक्रमाचे दर्शन तंजावरच्या शिलालेखात आहे. आदिलशाही सरदार दिलावरखान याने औशाचा किल्ला लढविला तेव्हा मालोजीने तो शर्थीने लढविला होता. निजामशाहीने मालोजीला 'राजा' हा किताब, पंचहजारी मनसबदारी व फौजेच्या खर्चासाठी पुणे, सुपे, चाकण व इंदापूरची देशमुखी व शिवनेरी किल्ला १६०३ मध्ये देऊन त्याचा गौरव केला होता. अशा प्रकारे मालोजीने आपला उत्कर्ष करून घेतला होता. भोसले घराण्याच्या उत्कर्षाचा पाया त्याने घातला.

शहाजी भोसले :-

मालोजीच्या मृत्यूच्या वेळी शहाजी ५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात शहाजी व त्यांचे बंधू शरीफजी यांचा सांभाळ त्यांची आई उमाबाई व चुलता विठोजी यांनी केला. निजामाने मालोजीची जहागीर त्याचा मुलगा शहाजी यास दिली होती. १६२०-२४ ही चार वर्षे शहाजीची निजामशाहीच्या दरबारात मलिकअंबरच्या नेतृत्वाखाली गेली.

Scanned with OKEN Scanner

शहाजी भोसले व लखुजी जाधव यांच्यात वितुष्ट आले ते खालील प्रसंगामुळे. निजामशहाचा दरबार संपल्यानंतर खंडागळे या सरदाराचा हत्ती उधळून जो दंगा झाला त्यात संभाजी भोसले व दत्ताजी जाधव हे दोघे ठार झाले. या दंग्याची माहिती समजल्यानंतर निजामशहाने मध्यस्थी करून तंटा मिटवला. परंतु निजामशहाने खेळोजी भोसले यांची बाजू घेतल्याने लखुजी जाधव हे नाराज झाले व १६२१ मध्ये निजामशाही सोडून लखुजी जाधव मोगलांना मिळाले. लखुजी जाधवांचे मोगलांनी स्वागत केले. लखुजी जाधव निजामशाही सोडून गेल्यानंतर शहाजीचे महत्त्व मोगल दरबारी वाढले.

भातवडीचे युद्ध - (३१ ऑक्टोबर १६२४) :- ही लढाई मलिकअंबर व त्याच्या हाताखालील शहाजी व इतर सरदार आणि दुसऱ्या बाजूला विजापूरकर व मोगल यांचे सरदार यामध्ये झाली. या लढाईचे मुख्य कारण निजामशाही व आदिलशाही यामधील बेबनाव व मोगलांची दक्षिण देश जिंकण्याची इच्छा हे होय. या लढाईचे वर्णन चिटणीस बखर व ९१ कलमी बखरीत आले आहे. शिवभारतात निजामाकडे जे सरदार या युद्धाच्या वेळी होते त्यांची यादी दिली आहे. या युद्धात लखुजी जाधव मोगलांकडून, तर शहाजी व त्याचे चुलतभाऊ हे निजामाकडून लढले. भातवडीच्या युद्धात शहाजीने मोठा पराक्रम दाखविला. त्याचा धाकटा भाऊ शरीफजी हा युद्धात मारला गेला. वास्तविक मलिक अंबरने शहाजीचा गौरव करावयास हवा होता. पण झाले उलटे. मलिक अंबरला शहाजीचा पराक्रम पाहवत नव्हता. मलिक अंबर व खेळोजी या दोघांनी एकत्र येऊन शहाजीविरुद्ध कारस्थाने सुरू केली. त्यामुळे शहाजी विटला व त्याने निजामशाही सोडून आदिलशाहीत जाण्याचे ठरविले. आदिलशहाने शहाजीशी संपर्क साधला व शहाजीला 'सरलष्कर' म्हणजे दुय्यम श्रेणीचा सेनापती हे पद दिले. निजामशाहीची मृत्युघटका जवळ आली आहे हे शहाजीने ओळखले होते.

आदिलशाही सोडून शहाजी पुन्हा निजामशाही दरबारात-१६२८ :- शहाजीने आदिलशाहीकडे आल्यानंतर पुणे परगणा व पाटसकडील मुलुख जिंकला. शहाजीने मलिकअंबरचा पराभव केला व सोलापूरचा किल्लाही आदिलशहाकडे ठेवण्यात यश मिळवले. केरळपर्यंत मोहिमा काढून त्याने बरीचशी लूटही मिळवली. १६२५-२८ या काळात शहाजी आदिलशहाकडे होता. परंतु १६२७ ला इब्राहीम आदिलशहा मृत्यू पावला. त्यानंतर विजापूर दरबारातील राजकीय चित्र पालटले. विजापूर दरबारातील मुस्लिम सरदार हिंदू सरदारांना पाण्यात पाहत होते. त्याचबरोबर [illegible]

Scanned with OKEN Scanner

शहाजीचा द्वेष करणारा मलिक अंबर मृत्यू पावला होता (१६२७). मोगल बादशहा शहाजहान हा निजामशाहीवर आक्रमण करणार अशी चर्चा होती. तेव्हा निजामशाहीच्या रक्षणासाठी शहाजी राजे यांना निमंत्रण आले तेव्हा त्यांनी आदिलशाहीचा त्याग करून निजामशाहीकडे पुन्हा जाण्याचे ठरविले. पुणे परगण्याचा मोकासा निजामशाहीकडून आपल्या नावाचा करून घेण्यास शहाजी महाराज विसरले नाहीत. मार्च १६२८ ते ऑक्टोबर १६३० पर्यंत अडीच वर्षे शहाजी निजामशहाच्या पदरी होते. याच सुमारास लखुजी जाधव हे पण निजामशाहीत परत आले होते.

२५ जुलै १६२९ रोजी लखुजी जाधव यास निजामाने दौलताबादला बोलावून घेतले व त्यांची व त्यांचे दोन पुत्र व एक नातू यांची हत्या केली. या हत्याकांडामुळे शहाजीच्या मनात सुलतानाबद्दल चीड निर्माण झाली व त्यांनी सुलतानशाहीचा त्याग करण्याचे ठरविले.

**शहाजी राजे मोगलांच्या चाकरीत - (१६३०-३२) :-** निजामशाहीतील कर्ते मुत्सद्दी शहाजी यांनी दिल्लीचे सत्ताधीश मोगल यांच्याकडे जाण्याचे ठरविले. सम्राट शहाजहानने शहाजीचे स्वागत करून त्यास ५ हजारी मनसब दिली. त्याशिवाय मानाचा पोशाख, रत्नजडीत खंजीर, निशाण, घोडा, हत्ती व २ लक्ष रु. खर्चासाठी दिले. शहाजी राजांची जुन्नर-संगमनेरकडील प्रदेश मोगलांसाठी जिंकून घेण्याच्या कामगिरीवर रवानगी करण्यात आली. दरम्यान १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर शिवाजी महाराजांचा जन्म झाला. मोगलांशी शहाजीचे फार काळ पटले नाही. त्यांनी मोगलांची नोकरी सोडण्याचे ठरविले. शहाजीची मनसब काढून ती त्यांना फितूर झालेल्या मलिक अंबरचा मुलगा फत्तेखान यास देण्याचे मोगलांनी ठरविले. त्यामुळे १६३२ मध्ये शहाजींनी मोगल दरबाराचा त्याग केला.

**शहाजी राजे पुन्हा निजामशाहीकडे - निजामशाहीचे पुनरुज्जीवन करण्याचा शहाजी राजांचा प्रयत्न : (१६३२-३६):-** निजामशाहीकडे आल्यानंतर शहाजी राजांनी मोगलांच्या हातून निजामशाही वाचविण्याचे प्रयत्न सुरू केले. १६३३ मध्ये निजामशाही घराण्याच्या एका वंशजाला गादीवर बसवून निजामशाहीचा कारभार पाहण्यास शहाजीने प्रारंभ केला. १६३२-३६ या काळात निजामशाहीचा कारभार सुधारून शेतसाऱ्यापासूनच २० लक्ष होन इतके उत्पन्न मिळवले. मोगलांना शहाजीचा उत्कर्ष पाहवेना. म्हणून मोगलांनी आदिलशाहीच्या सहकार्याने निजामशाहीविरुद्ध मोहीम

Scanned with OKEN Scanner

केले. शहाजीच्या जहागिरां जप्त करण्यात आदिलशहाला यश आले नाही. दोन मुलांनी आदिलशहाच्या दोन्ही सरदारांचा पराभव केल्याने शहाजीची मुक्तता करण्याचे आदिलशहाने ठरविले. शहाजीच्या सुटकेच्या मोबदल्यात आदिलशहाने शहाजीकडून कोंढाणा, कंदर्पी व बंगलोर हे किल्ले घेतले व शिवाजी व संभाजी हे आदिलशहाविरुद्ध बंडखोरी करणार नाहीत असे आश्वासन घेतले.

**१६४९-६४ या कालखंडातील शहाजींच्या हालचाली :-** शहाजींच्या सुटकेनंतर आदिलशहाने त्यास पुन्हा कर्नाटकात पाठवले. १६१३ मध्ये शहाजीने गोवळकोंडयाचा वजीर मीर जुम्लाचा पराभव करून त्याच्याकडून ६ लक्ष होन खंडणी घेतली. १६५४ साली कनकगिरीच्या आप्पाखानने आदिलशहाविरुद्ध बंड पुकारले तेव्हा त्याचा बीमोड शहाजीने केला. हा बीमोड करतानाच शहाजीचा मोठा पुत्र संभाजी हा तोफेचा गोळा लागून ठार झाला. शहाजीने जातीने लक्ष घालून अप्पाखानास जिंकले. यावेळी अफझलखान हा सोबत असूनही त्याने संभाजीला मदत केली नाही. तेव्हा संभाजींचा जो विश्वासघात केला त्याचा बदला शिवाजीने पुढे अफझलखानाचा वध करून घेतला.

**शहाजीचा मृत्यू :-** कर्नाटकातील हिंदू पाळेगारांना आपल्या छत्राखाली एकत्र आणून त्यांचे 'स्वतंत्र हिंदू राज्य' स्थापन करावे असे स्वप्न शहाजी राजांनी पाहिले होते. शहाजीची वाढती शक्ती पाहून विजापूरच्या आदिलशहाने १६३६ मध्ये त्यास तुरुंगात टाकले. पण शेवटी शिवाजीचे वाढते सामर्थ्य विचारात घेऊन त्यास बिनशर्त सोडून दिले गेले. इ. स. १६६२ मध्ये शहाजीराजे महाराष्ट्रात आले. इ. स. १६६३ मध्ये ते कर्नाटकात परत गेले. २३ जानेवारी १६६४ रोजी घोडयावरून खाली पडून शहाजींचे निधन झाले.

**शहाजीराजे यांच्या कामगिरीचे मूल्यमापन :-** शहाजी राजे यांच्या कामगिरीची प्रशंसा सर्वच इतिहासकारांनी केलेली आहे. शौर्य, धैर्य, बुद्धिमत्ता, चलाखी इ. गुणांमुळेच निजामशाहीत त्यांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. निजामशाहीबरोबरच आदिलशाही व मोगलशाहीतही त्यांना विशेष स्थान, यश, महत्त्व प्राप्त झाले होते. आदिलशहा व निजामशाहीतील राज्यकर्त्यांना शहाजीची नेहमीच धास्ती वाटे. शहाजी महाराजांना स्वतंत्र राज्य स्थापन करता आले नाही, पण शिवाजी व व्यंकोजी या त्यांच्या मुलांनी महाराष्ट्रात व तंजावर येथे स्वतंत्र राज्ये स्थापन केली. यात शहाजींचे

Scanned with OKEN Scanner

मोठेपण व कर्तृत्व सामावलेले आहे. शहाजीची जी जहागीर होती. त्या प्रदेशातच शिवाजी महाराजांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. **वि. का. राजवाडे** यांच्या मते, "महाराष्ट्रातील स्वराज्य स्थापनेचे सर्व श्रेय शिवाजीच्या पदरात पडले हे खरे. परंतु मूळ कल्पना व योजना शहाजीची असल्याने शहाजीला या श्रेयाचा वाटेकरी करणे इतिहासाला प्राप्त आहे." गो. स. सरदेसाई यांनी शहाजी राजांना 'राज्यसंकल्पक' म्हटले आहे. **गो. स. सरदेसाई** लिहितात, "विजयनगर राज्याच्या पतनानंतर शहाजीच असा पहिला हिंदू नेता झाला की जो स्थानिक मार्गांची माहिती आणि द्रुतगती लष्करी मोहिमांच्या आधारे दिल्ली व विजापूरच्या फौजांशी मुकाबला करू शकत होता."

'गनिमी कावा' या युद्धपद्धतीचा प्रणेता मलिक अंबर होता. शहाजीने या युद्धपद्धतीचा उपयोग करून घेऊन ४-६ वर्षे मोगलशाहीविरुद्ध झुंज दिली ही बाब विशेष महत्त्वाची आहे. कर्तृत्व, धडाडी, पराक्रम, लष्करी सामर्थ्य वगैरे सर्व गोष्टी शहाजीजवळ होत्या तरी स्वतंत्र राज्य त्यांनी स्वतः का स्थापन केले नाही, हा प्रश्न उद्‌भवतो. कदाचित या कार्यात आपणास यश येणार नाही असे त्यांना वाटले असावे. शिवाजीचा मार्गदर्शक व राजनिर्माता (King Maker)या नात्याने मराठ्यांच्या इतिहासात त्यांचे स्थान श्रेष्ठ आहे यात शंका नाही. शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत शहाजीचे विचार, संस्कार व कर्तृत्व इ. चा वाटा निश्चित होता.

**राजमाता जिजाबाई :-** भारताला कीर्ती व वैभव प्राप्त करून देणाऱ्या राष्ट्रपुरुषांची चरित्रे सर्वांना माहीत आहेत. पण त्यांच्या मातांची चरित्रे व कार्य याची माहिती मात्र फारशी नसते. युगपुरुष शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजाबाई अशा मातांपैकीच एक आहेत. शिवाजी महाराजांना स्फूर्ती देऊन मार्गदर्शन करण्याचे काम तिने अत्यंत समर्थपणे केल्यामुळेच शिवाजी महाराजांना शून्यातून स्वराज्याची निर्मिती करता आली. शहाजीचे शिवाजीकडे दुर्लक्ष असतानाही तिने 'शिवाजी'ला घडविले व अप्रत्यक्षपणे महाराष्ट्राच्या इतिहासाला वेगळे वळण देण्याची कामगिरी बजावली.

जिजामाता यांचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी लखुजी जाधव व गिरजाबाईच्या पोटी विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यातील सिंदखेडराजा या गावी झाला. लखुजी जाधव हे अत्यंत पराक्रमी, महत्त्वाकांक्षी व कुलाभिमानी सरदार होते. लखुजी जाधव हे स्वतःला देवगिरीच्या यादवांचे वंशज समजत. इ. स. १५५० मध्ये ते

जन्मास आले असावेत. शिवपूर्वकाळात विशिष्ट परिस्थितीत निजामशाही व आदिलशाहीच्या आश्रयाने जी काही मराठा कुळे उदयास आली त्यात सिंदखेडचे जाधव, वेरूळचे भोसले, फलटणचे पवार-निंबाळकर यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. लखूजी जाधव यांची समाधी सिंदखेडराजा येथे असून तिला घुमट आहेत व या घुमटाच्या पूर्व व उत्तर दरवाजावर दोन शिलालेख आहेत. त्यातील मजकुरावरून लखूजी जाधव यांच्या आईचे नाव ठकाबाई व वडिलांचे नाव विठोजी होते. लखुजीला ३ बायका होत्या. त्यापैकी गिरजाबाई ही जिजाबाईची आई. लखुजी जाधवांना ४ मुलांनंतर जिजाबाई झाली. आपणास कन्या व्हावी यासाठी जिजाबाईच्या आईने नवस केल्याचा उल्लेख एका पोवाड्यात आहे.

लखूजी जाधव हे अत्यंत मुत्सद्दी, कर्तबगार होते. निजामशाहीत ते पंचहजारी मनसबदार होते. पुढे त्यांना सिंदखेडची 'देशमुखी' मिळाली. सिंदखेडला स्थायिक झाल्यानंतर दहा हजारी मनबसदारी, २८ महाल व ५२ चावड्यांचे वतन मिळाले. विजापूर दरबारातील मातब्बर सरदार म्हणून ते ओळखले जात. १५९४-१६०० या काळात सम्राट अकबराने निजामशाही बुडविण्याचा प्रयत्न केला. तेव्हा ती वाचवण्याचे श्रेय काही प्रमाणात लखूजी जाधव यांच्याकडे जाते. पुढे १६२९ मध्ये लखूजी जाधव, त्यांचे दोन पुत्र व एक नातू यांची हत्या दौलताबाद मुक्कामी निजामशहाच्या उपस्थितीत झाली. अदूरदर्शी व मद्यपी निजामशहा त्याच्या सरदारांचे ऐकून हे हत्याकांड घडवून आणले होते. तसेच लखुजी जाधव व शहाजी राजे यांचे झालेले नातेसंबंध, स्नेह व दोघांचे निजामशाहीत परतणे हे निजामशाहीतील मुस्लिमांना न आवडल्याने हे हत्याकांड घडून आले. या हत्याकांडामुळे जिजाबाईवर जणू दुःखाचा डोंगरच कोसळला. त्यांचे माहेरचे छत्र हरवले होते. शहाजी राजे यांनी चिडून निजामशाहीचा मुलुख लुटण्यास प्रारंभ केला. निजामशाहीत फंदफितुरी वगैरे संकटे त्यांनी उभी केली. त्यामुळे निजामशाहीतील सरदार फुटून काही मोगलशाहीत तर काही आदिलशाहीत गेले.

जाधव घराणे व भोसले घराणे यांच्यात जिजाबाई-शहाजीच्या रूपाने जो विवाह संबंध झाला त्यामुळे दोन्ही घराण्यांचा लौकिक वाढला होता. या विवाहासंबंधी बखर साहित्यात काही नोंदी आल्या आहेत. त्यानुसार लखुजी जाधवांच्या बायकांचा जिजाबाई भोसल्यांच्या कुळास द्यावयास विरोध होता. भोसल्यांनी बळजबरीने जिजाबाईला आपल्या कुळात द्यावयास भाग पाडले. जाधव-भोसले वैराच्या कथा ज्या बखरकारांनी

Scanned with OKEN Scanner

दिल्या आहेत त्यात एकवाक्यता नाही. समकालीन साधन 'शिवभारत' यांच्या नोंदीनुसार "उत्तम लक्षणांनी युक्त दानशील, दयाशील, युद्धकुशल, महातेजस्वी अशा मालोजीपुत्र शहाजीला पाहून कुबेरागत श्रीमंत जाधवरावंने ज्योतिषाने सांगितलेल्या, अनुकूल ग्रह असलेल्या शुभमुहूर्तावर आपली विजयलक्षणा कमलनेत्रा व कुलास शोभा आणणारी कुलवान कन्या जिजाऊ वरदक्षिणेसह शहाजीस अर्पण केली. रामसिंग भाट व बजरंग भाटाच्या कवनातील माहितीनुसार जिजाबाई ५ वर्षांची व शहाजी राजे ८ वर्षांचे असतांना शहाजी व त्यांचे वडील सिदंखेडराजा येथे दरबारी आले असता जिजा-शहाजी गुलाल खेळू लागले तेव्हा मालोजी राजे आनंदाने मोठ्याने ओरडून म्हणाले, "मंडळी, ऐकलंत का ? झाला प्रकार पाहिलात ना ? जाधवराव आमचे व्याही झाले. जिजा आमची सून झाली." बखरकारांनी जाधव-भोसले वैर गृहीत धरून लग्नप्रसंगी केलेली मांडणी चुकीची आहे. जिजाबाई-शहाजीचे लग्न १६१० च्या सुमारास चांगल्या वातावरणात व रूढीप्रमाणे झाले होते.

जिजाबाई-शहाजीला एकूण ६ पुत्र झाले. त्यापैकी संभाजी व शिवाजी हे दोघे जगले. बाकी ४ अल्पजीवी होते. शिवनेरी किल्ल्यावर जन्म झाला म्हणून नाव ठेवले 'शिवाजी' असे परमानंद लिहितो. परंतु शिवनेरी किल्ल्यावर श्री भवानी शिवाई देवी ही नवसाला पावली म्हणून पुत्राचे नाव शिवाजी ठेवले असे बखरकार म्हणतात.

१६३६ मध्ये शहाजी राजांनी कर्नाटक हे स्वतःचे कार्यक्षेत्र निश्चित केल्यानंतर जिजाबाईला पुण्याच्या जहागिरीची व्यवस्था पाहण्यासाठी बाल शिवाजी व दादोजी कोंडदेव यांच्यासोबत ठेवले. १६३०-३२ या काळातील भीषण दुष्काळ, १६३४-३६ या काळातील मोगली आक्रमण, विजापूरकरांनी पुणे जहागिरीवर केलेले हल्ले इ. मुळे पुणे परगणा बेचिराख झाला होता. शहाजी राजांचे पुण्यातील वाडे बेचिराख झाल्याने कोठे राहावयाचे हा प्रश्न होता. पुण्याच्या दक्षिणेस सात कोसांवर खेडेबारे येथे दादोजींनी जागा विकत घेऊन शिवाजी-जिजाबाईसाठी वाडा बांधला. जिजाबाईनेच खऱ्या अर्थाने शिवाजी घडविला. रामायण-महाभारतातील कथा जिजाबाईने बाल शिवाजीस ऐकविल्या. हिंदूंचे मुसलमानांकडून होणारे धर्मांतर, गोहत्या, मंदिरांचा विध्वंस हे चित्रही तिने शिवाजीपुढे उभे केले. बालमन हे अत्यंत संस्कारक्षम असते. या वयातच जिजाबाईने शिवाजीचे मन घडविले. अन्यायाचा तिरस्कार व प्रतिकार करण्याची शिवाजीची मानसिकता तयार करण्यामागे जिजाबाईचे योगदान मोठे होते यात शंकाच

शिवाजीच्या सुरक्षिततेसाठी व संगोपनासाठी कोणीतरी मायेचा माणूस ठेवणे आवश्यक होते. म्हणून जिजाबाईला शिवाजीसोबत पुण्यास ठेवण्यात आले होते. आपल्या पतीच्या पराक्रमावर, धाडसावर तिची पूर्ण श्रध्दा होती. पुणे जहागिरीतील प्रजेस न्यायनिवाडा देण्याचे कामही तिने पाहिले. तसेच तिने काही सनदाही दिल्या होत्या. शहाजीस पेचात पकडण्यासाठी मोगल सरदार महाबतखान याने एका सरदारामार्फत जिजाबाईला अटक केले.पण जिजाबाई घाबरल्या नाहीत. जिजाबाईचा चुलता मोगलांच्या दरबारी असल्याने त्याच्या प्रयत्नातून जिजाबाईची सुटका झाली. मोगलांशी लढा देण्याची महत्त्वाकांक्षा व इच्छा जिजाबाईने मनाशी बाळगली होती. तिने त्या दिशेने संस्कार शिवाजीवर केले होते. जिजाबाईची ही इच्छा पुढे शिवाजी महाराजांनी पूर्ण केली.

जिजाबाईबद्दल इतिहासकारांचे अभिप्राय:- जिजाबाईच्या कामाचे, चरित्राचे मूल्यमापन अनेक इतिहासकारांनी केलेले आहे. **गो. स. सरदेसाई** यांच्या मते "शिवाजीला योग्य ते प्रोत्साहन देऊन त्याच्याकडून मराठ्यांचे स्वराज्य स्थापण्याची इच्छा जिजाबाईने पूर्ण करून घेतली. नानाविध विपत्ती सहन करून जो हा सुयोग तिने घडवून आणला त्यामुळे महाराष्ट्राचा भाग्योदय झाला." **भारताचार्य चिंतामणराव वैद्य म्हणतात,** "शिवाजी महाराजांची मातृभक्ती विलक्षण होती. सुदैवाने जिजाऊसारखी पूज्य, निस्पृह, करारी, सद्गुणी अशी त्यास मातुश्री लाभली होती. तिची भक्ती ठेवण्याचा त्यांनी प्रयत्न केला व कोणतीही गोष्ट तिला विचारल्याशिवाय केली नाही." **महादेव गोविंद रानडे** यांनी Rise of Maratha या ग्रंथात म्हटले आहे, "जिजाबाई केवळ थोर कुळात उत्पन्न झाली व तिचा शरीरसंबंध (लग्न) थोर घराण्याशी आला होता या एवढ्याच गोष्टीवर तिची थोरवी अवलंबून नव्हती. तिच्या थोरपणास तिच्या अंगचे गुणच कारणीभूत होते. शिवाजीचे जिजाबाईवर अतोनात प्रेम होते. प्रत्येक गोष्टीत तो जिजाबाईचा सल्ला घेई. जिजाबाईने पाजलेल्या बाळकडूनेच स्वकर्तव्याची त्यास पूर्ण ओळख करून दिली. कोणत्याही अवघड कामगिरीवर जावयाचे असले म्हणजे शिवाजी प्रथम आईचा आशीर्वाद घेई. शिवाजी जो इतका उदयास आला त्याला तरी बहुतांशी त्याची आई जिजाबाईच जबाबदार होती. **डॉ. बाळकृष्ण** यांनी "Shivaji The Great" या इंग्रजी ग्रंथात म्हटले की, "In one word Jijabai had the head of man over the shoulders of a women. She remained a guide, philosopher and friend of Shivaji throughout her life. She anxiously watched the rising sun of the glory of her son and was fortunate to

Scanned with OKEN Scanner

witness it's cloimax in the form of his coronation as an independent king as an ornament of the Kshatriya Kula " **कै. वासुदेवशास्त्री खरे** यांनी 'शिवसंभव' या नाटकात जिजाबाईची तेजस्वी व्यक्तिरेखा रंगविली असून शिवाजी महाराजांच्या ठायी स्त्री जातीबद्दल जो इतका आदर होता त्याचे मुख्य कारण त्याची स्वत:ची आदर्श माता होय असे म्हटले आहे. सेतू माधवराव पगडी यांच्या मते, "आपल्या विख्यात पुत्राच्या आयुष्यभर चाललेल्या संघर्षात जिजाबाई ही त्यास स्फूर्ती देणारी शक्ती ठरली. परस्परावर निष्ठा व माया असणाऱ्या माता-पुत्रांची अशी उदाहरणे इतिहासात क्वचित आढळतील.'' शिवाजी महाराजांना वडिलांचा क्वचित सहवास लाभे. त्यामुळे आई, वडील, भाऊ, बहीण, शिक्षक, मार्गदर्शक इ. सर्व नाती जिजाबाईलाच वठवावी लागली.

जिजाबाईने रणांगणावर पराक्रम केला नसला तरी शिवाजीसारख्या पुत्रास जन्म दिला. 'शिवाजी'ची जडणघडण केली म्हणून तिचे नाव इतिहासात नोंदविले गेले आहे. पती निधनानंतर सती जाण्याचा जिजाबाईचा मानस होता. पण शिवाजीनेच आई जिजाबाईला सती जाण्यापासून परावृत्त केले. जिजाबाई धर्मनिष्ठ होत्या, पण अंधश्रद्धा बाळगणाऱ्या नव्हत्या. जिजाबाईंनी पुण्यात कसबापेठेत गणपतीची स्थापना केली व जोगेश्वरी व केदारेश्वर मंदिरांचाही जीर्णोद्धार केला. शिवाजीने स्वतंत्र्य राज्य स्थापन करावे हे जिजाबाईचे स्वप्न होते. ते स्वप्न शिवाजीच्या राज्याभिषेकाने साध्य झाले. त्या एका अर्थाने तृप्त, आनंदी व समाधानी झाल्या होत्या. आपला पुत्र एक स्वतंत्र राज्याचा 'छत्रपती' झाला हे पाहण्याचे भाग्य तिला लाभले होते. १७ जून १६७४ रोजी रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड या गावी त्या मृत्यू पावल्या.

दादोजी कोंडदेव :-

शिवाजी महाराजांचे गुरू म्हणून दादोजी कोंडदेव यांचा उल्लेख केला जातो. दादोजी कोंडदेव हे अतिशय प्रामाणिक, कार्यक्षम व कर्तबगार प्रशासक होते. त्यांनीच शिवाजीला राज्यकारभार, न्यायदान वगैरेचे शिक्षण दिले. शिवाजीचे व्यक्तिमत्त्व घडविण्यात ज्या प्रमुख व्यक्तींचा सिंहाचा वाटा होता, त्यापैकी दादोजी कोंडदेव हे एक होते.

दादोजी कोंडदेव हे देशस्थ ब्राह्मण होते. पाटस परगण्यातील मलठण गावाचे ते कुलकर्णी होते. त्यांचे मूळ आडनाव गोचिवडे. दादोजी कोंडदेव हे शहाजी राजे भोसले यांच्याकडे नोकरीस कधी आले हे सांगता येत नाही. परंतु शहाजी राजे यांना पुणे, सुपे, चाकण, इंदापूर हे परगणे जहागीर मिळाले होते. (१६३६) तेव्हा या परगण्यांवर

Scanned with OKEN Scanner

१६३० ही शिवजन्मतिथीच मान्य करावी लागते. कारण खालील साधनात तशी ऐतिहासिक नोंद आहे.

१. दासपंचायतन शकावली (रचनाकाळ १७३५)

२. राज्याभिषेक शकावली (रचनाकाळ १६६४)

३. जेधे शकावली (रचनाकाळ १६९६)

विशेषत: जेधे शकावलीतील शक, संवत्सर, तिथी, वार, नक्षत्र, योग परस्पराशी पूर्णपणे जुळतात. शिवापूरकर देशपांडे वहीमध्ये शके १५५१ मध्ये (इ. स. १६३०) शिवाजी जन्मास आला असे म्हटले आहे. कवी परमानंद याने शके १५५१ फाल्गुन वद्य ३ ही तारीख दिली आहे. निजामशाहीची वाताहत झाल्यानंतर पावसाळ्यात शहाजी पुणे येथे जहागिरीत आला होता. त्या काळातच जिजाबाई गरोदर राहिल्या. पुढे १६३०ला त्यांना पुत्ररत्न प्राप्त झाले. शिवभारत, बादशहानामा, वाका-इ-सुनोत, महंमदनामा या सर्व ऐतिहासिक साधनांच्या आधारे शिवजन्मतिथी १६३० साली येते. जोधपूर, बिकानेर, बनेडा येथे महाराजांची टिपणे उपलब्ध झाली आहेत. त्यातही १६३० ही तारीख येते. महाराजांच्या ज्या चार कुंडल्या उपलब्ध आहेत त्यापैकी ३ कुंडल्यांनुसार शिवजन्म तिथी शके १५५१, फाल्गुन वद्य ३, शुक्रवार रात्री अशी येते. 'शककर्ते शिवराय' या ग्रंथाचे लेखक श्री. विजय देशमुख यांनीही हीच तारीख ग्राह्य धरली आहे. तंजावर येथील शिलालेखात शिवजन्माचे वर्ष शके १५५१ दाखविले आहे. कृष्णाजी अनंत सभासद हा शिवजन्मतिथीचा उल्लेख करीत नसला तरी "दादोजी कोंडदेव हा जिजाबाई-शिवाजीसोबत बंगलोर येथे शहाजी महाराजांच्या भेटीस गेला होता. तेव्हा शिवाजीचे वय १२ वर्षांचे होते" असे म्हणतो. ही भेट इ. स. १६४२ सालची आहे. या पुराव्यावरून शिवाजी जन्मतिथीचे वय इ. स. १६३० हेच निश्चित होते. चिटणीस व सभासद बखरकार आणि कवी भूषण यांनी शिवाजीला अवतार मानले असले तरी शिवाजीने असा दावा कधी केल्याचे दिसत नाही.

## शिवाजीचे बालपण व शिक्षण

(शिवाजीचे बालपण व शिक्षण याची माहिती जिजाबाई व दादोजी कोंडदेव

Scanned with OKEN Scanner

विजापूरच्या आदिलशहाने पुणे, [illegible] हे चार परगणे शहाजीस दिले असले तरी जहागिरीच्या प्रदेशात जे किल्ले होते ते आदिलशहाच्याच किल्लेदाराच्या ताब्यात होते. एक किल्ला कोंढाणा हा दादोजी कोंडदेव यांच्याकडे विजापूरकर सरकारचे अधिकारी या नात्याने त्याच्या ताब्यात होता. दादोजी कोंडदेव यांच्याकडे दुहेरी (किल्लेदार, सुभेदार) स्वरूपाची जबाबदारी होती. शहाजीच्या जहागिरीचा जसा तो प्रमुख होता तसाच तो आदिलशहाकडून नियुक्त झालेल्या या भागाचा सुभेदारही होता.

शिवाजी महाराजास ४ परगण्यांची जहागीर मिळाली होती. इतर सरदारांप्रमाणे आदिलशहाच्या दरबारातही त्यास मानाची नोकरी मिळू शकली असती. परंतु मुसलमानी अत्याचारांमुळे स्वाभिमानशून्य झालेला मराठी माणूस पाहून तरुण शिवाजी महाराजांना मुसलमानी अत्याचार थांबवण्याची निकड वाटू लागली. त्यांचे मन अस्वस्थ होऊ लागले. महाराष्ट्रात 'स्वराज्य' निर्माण करता येईल असे त्यांना वाटू लागले. शिवाजी महाराजांचे आकर्षक व्यक्तिमत्त्व, मनमिळावू स्वभाव, ध्येयनिष्ठा इ.मुळे त्यांच्याभोवती तरुण अनुयायी हळूहळू जमा होऊ लागले.

परमानंद कवीने शिवाजीच्या बाललीलांचे वर्णन 'शिवभारत' या ग्रंथात केले आहे. ग्रँट डफ व सर जदुनाथ सरकार या दोन इतिहासकारांनी शिवाजी निरक्षर होता, त्यास लिहिता वाचता येत नव्हते असे मत व्यक्त केले आहे. पण ते खरे नाही. त्याकाळी पराक्रमी मराठी सरदार लिहिण्यावाचण्याकडे दुर्लक्ष करत. युद्धशास्त्रात पारंगत होत व आपले नशीब काढत. हे जरी खरे असले तरी 'शिवाजी निरक्षर होता' हे मत चुकीचे आहे व ते सिद्ध करण्यासाठी तत्कालीन पुरावे उपलब्ध आहेत. कवी परमानंद यांनी 'शिवभारता'त स्पष्टपणे सांगितले आहे की, "शिवाजी हा ६ वर्षांचा झाल्याबरोबर त्याच्या शिक्षणाची व्यवस्था केली गेली होती. तो ६ वर्षांचा झाल्याबरोबर त्याला पंतोजींच्या मांडीवर बसवून अक्षरओळख करून दिली." शिवाजीने अत्यंत हुशारीने अक्षरओळख करून घेतली व त्याच्या हुशारीबद्दल त्याच्या गुरूला अभिमान होता असेही परमानंद यांनी लिहून ठेवले आहे. स्वत: शहाजी राजे आपला पुत्र शिवाजी यास निरक्षर ठेवतील या गोष्टीवर विश्वास बसत नाही. शिवाजी महाराजांना मराठी, संस्कृत, हिंदी तसेच फारसी, कानडी या भाषांचेही चांगले ज्ञान असावे. शिवाजी एक-दीड वर्ष बंगलोर येथे मुक्कामी असल्याने त्यांचा कानडीशी परिचय झाला असावा. इटालियन

Scanned with OKEN Scanner

निकोलस मनुची याने, "Storia Do Mogor" (मोगलांचा इतिहास) हा ग्रंथ लिहिला असून त्यात तो म्हणतो की, ''कोणाच्याही मदतीवाचून दुभाष्याचे साहाय्य न घेता शिवाजीने मला हिंदुस्थानातील अनेक प्रश्न विचारले. ते सर्व प्रश्न भेदक व खोचक होते.'' मनुची यास हिंदुस्थानी येत होते व त्याच्या प्रवासवर्णनातील नोंदीनुसार शिवाजी महाराजांना कामचलाऊ हा होईना हिंदुस्थानी (हिंदी) येत असावे. शिवाजी बहुश्रुत असल्याने त्याने बरेचसे शिक्षण ऐकूनही घेतले असावे. अनेक कला, शास्त्रे, राजनीती इ. चे शिक्षण त्यांना मिळाले होते. **विजय देशमुख 'शककर्ते शिवराय'** या ग्रंथात लिहितात, ''महाराजांना संस्कृतची असलेली आवड, फारसी व हिंदीचे असलेले ज्ञान, त्यांचे दुर्गबांधणीचे ज्ञान, राजव्यवहारकोश, करणकौस्तुभ, शिवभारतादी ग्रंथरचनेला त्यांनी दिलेली प्रेरणा या साऱ्यांचा विचार करता ते निरक्षर, अशिक्षित होते असे म्हणणे हास्यास्पद ठरेल.''

**शिवाजी महाराजांच्या स्वराज्य निर्मितीच्या कामास प्रारंभ :-**

**१. बारामावळ प्रांत जिंकला :-** स्वतंत्र ध्वज, अनुभवी व मुत्सद्दी मंत्री, काही घोडे- हत्ती व विपुल संपत्ती देऊन शहाजी महाराजांनी शिवाजीला १६४२ मध्ये पुण्यास पाठवले. त्यांच्यासोबत जिजाबाई-दादोजी कोंडदेवही पुण्यास आले तेव्हा त्यांच्यापुढे निश्चित सुस्पष्ट असे ध्येय होते. कृष्णाजी अनंत सभासद यांनी सभासद बखरीत याचा स्पष्ट उल्लेख केला आहे.

पुणे जिल्ह्याच्या पश्चिम भागास मावळ अशी संज्ञा आहे. मावळ म्हणजे सह्याद्रीच्या उतरणीवरचा (मावळतीचा) प्रदेश. पुणे जहागिरीत पुढील बारा मावळ प्रदेश होते.

१. अंदरमावळ २. नाणे मावळ ३. पवन मावळ ४. घोटण मावळ ५. मोसे मावळ ६. मुठे मावळ ७. गुंजन मावळ ८. वेळवंड मावळ ९. कर्यात मावळ १०. जुने मावळ ११. हिरडस मावळ १२. शिवरळ मावळ.

या मावळ प्रदेशाचे वैशिष्ट्य म्हणजे ही १२ डोंगरखोरी होती. दळणवळणाच्या सोयी नव्हत्या. जंगल प्रचंड होते. पर्जन्यमानही प्रचंड होते. या मावळ प्रदेशात स्वतंत्र प्रवृत्तीचे देशमुख राहत. ते सतत एकमेकांशी संघर्ष करीत असत. हे वतनदार देशमुख आपल्या वतनाच्या संरक्षणासाठी सैन्य ठेवत. शेतीस प्रोत्साहन देत. आपल्या वतनाचा विस्तार करण्यासाठी परस्परांचे खून, मारामाऱ्या, सूड, छुपे हल्ले इ. प्रकार चालत.

Scanned with OKEN Scanner

म्हणजे या मावळ खोऱ्यात 'बळी तो कान पिळी' हाच न्याय होता; कायदा होता. अशा या पुंड, आडदांड देशमुखांना शिवाजी महाराजांनी एका सूत्रात गोवून आपल्या वर्चस्वाखाली आणण्यात यश मिळवले. या मावळ प्रदेशातूनच शिवाजी महाराजांना अनुयायी मिळाले. त्यांत प्रामुख्याने कोंडाजी व येसाजी कंक, तानाजी व सूर्याजी मालुसरे, बाजी पासलकर, बापूजी मुदगल देशपांडे, जिवा महाला, बाघोजी तुपे, सूर्याजीराव काकडे, कान्होजी जेधे यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. हे सर्व शूर, पराक्रमी, एकनिष्ठ व कर्तबगार होते. बांदल घराणे हे तीन पिढ्यांपासून या बारा मावळ प्रदेशावर राज्य करीत होते. कृष्णाजी नाईक बांदल, कान्होजी नाईक जेधे (देशमुख) यांच्यात नेहमीच संघर्ष होत असत. शहाजी राजांनी कान्होजी नाईकांना मोठ्या विश्वासाने आपल्या बाजूस वळवून एका प्रकारे कृष्णाजी बांदलला शह दिला. कान्होजी जेधे व त्याच्या मुलांनी व सैन्याने शिवाजीला पुढे प्रत्येक संकटाच्या वेळी अतिशय आपुलकीने मदत केली. कान्होजी जेध्यांबरोबरच बाजी पासलकर (देशमुख) हे पण शहाजीच्या बाजूस आले. विशेष म्हणजे कृष्णाजी बांदल याचा पूर्ण बीमोड केल्यामुळे बारा मावळातील देशमुख मंडळी ही हळूहळू शिवाजी महाराजांकडे येऊ लागली. त्यात प्रामुख्याने पुढील मावळ प्रदेशातील देशमुखांचा उल्लेख करावा लागेल. ही सर्व मंडळी मायेने-निष्ठेने शिवाजी महाराजांशी जोडली गेली.

१. कानद खोरे - झुंझारराव देशमुख
२. गुंजन मावळ - हैबतराव देशमुख
३. खेडेबारे - कोंडे देशमुख
४. रोहिड खोरे -जेधे-खोपडे-देशमुख
५. मोसे मावळ - बाजी पासलकर
६. कर्यात मावळ - विठोजी देशमुख

बारा मावळ प्रदेशातील देशमुखांना वठणीवर आणणे व त्यांना शिवाजीच्या सेवेत आणणे यात दादोजी कोंडदेव यांचा वाटा महत्त्वाचा होता.

**२) तोरणा किल्ला जिंकला :-** मावळखोऱ्यावर स्वतःचे नियंत्रण प्रस्थापित करत असताना शिवाजी महाराजांच्या लक्षात आले की, या प्रदेशातील कोंढाणा, पुरंदर, चाकण, तोरणा, राजगड, रोहिडा, सुभानमंडळ हे किल्ले पण ताब्यात घेणे आवश्यक आहे. या किल्ल्यावर आदिलशहाची मालकी होती. ते जिंकायाची ...

शिवाजीच्या मनात निर्माण झाली. पावसाळ्यात या किल्ल्यांवर आदिलशहाचे लष्कर राहत नसे. तसेच यावेळी आदिलशाही दरबारात अंतर्गत कलह व कटकारस्थाने सुरू झाली होती. या स्थितीचा फायदा घेण्याचे शिवाजी महाराजांनी ठरवले. प्रस्तुत नमूद किल्ले जिंकणे आवश्यक आहे कारण ज्याच्या ताब्यात किल्ला तो आजूबाजूच्या प्रदेशावर नियत्रंण ठेवू शकतो हे शिवाजी महाराजांच्या लक्षात आले. किल्ले जिंकणे म्हणजे आदिलशहाशी उघड वैरच हेही स्पष्टच होते.

सर्वसाधारणपणे अशी समजूत आहे की, महाराजांनी तोरणा किल्ला घेऊन स्वराज्याचे तोरण बांधले. ग्रँट डफने चिटणीस बखरीच्या आधारे हे विधान केले आहे. परंतु त्यास तत्कालीन इतर पुरावा नाही. शिवदिग्विजय बखर व इतर काही नोंदींनुसार शिवाजी राजांनी सर्वप्रथम म्हणजे इ. स. १६४२-४३ च्या सुमारास शहामृग पर्वतावर (राजगडाच्या डोंगराला शहामृग पर्वत म्हणत असत.) ठाणे करून इमारती बांधल्या व त्याचे नाव राजगड ठेवले असा उल्लेख सापडतो. शिवाजी महाराज, दादोजी कोंडदेव व शिवाजीचे सवंगडी यांनी राजगड-रोहिडा दरम्यानचा रोहिडखोरे व बेलवंड खोऱ्यातील प्रदेश जिंकून स्वत:चे वर्चस्व प्रस्थापित केले. मोर तालुक्यातील सह्याद्रीच्या शिखरावर रोहिडेश्वराचे (शंभू महादेव) देवालय होते. या देवालयात शंभू महादेवाच्या साक्षीने शिवाजी राजांनी सवंगड्यांसह स्वराज्य स्थापन करण्याच्या शपथा घेतल्या होत्या.

**३) आदिलशहा-शहाजी राजे संबंधांत तात्पुरता तणाव (१६४५-४६) :-** शिवाजी राजांनी स्वराज्य स्थापण्याचा संकल्प सोडला होता व त्यानुसार त्यांच्या हालचाली सुरू होत्या. त्याकडे आदिलशहाचे लक्ष होते. शिवरळ येथे आदिलशहाचे ठाणे होते व मियारहीम अहमद हा तेथे ठाणेदार होता. मुस्तफाखान या आदिलशहाच्या सरदाराने शहाजीविरोधी त्याचे कान भरवले. आदिलशहाचे शहाजीबद्दलचे मत कलुषित केले. परिमाणी आदिलशहाने शहाजीची जहागीर जप्त करण्याचे ठरविले होते व तसे घोषितही केले होते. पण आदिलशहाचा शहाजीबद्दल झालेला गैरसमज दूर झाला. आदिलशहाने शहाजींना कर्नाटकाच्या मोहिमेवर पाठवले व त्या मोहिमेत शहाजीस यश आल्याने आदिलशहाची शहाजीवरची नाराजी दूर झाली. शहाजीच्या जहागीर जप्तीचे काढलेले फर्मान आदिलशहानें दूरही केले. इ. स. १६४५ पासून शिवाजी राजे पुण्याचा कारभार स्वतंत्रपणे पाहू लागले. दरम्यान ७ मार्च १६४७ रोजी दादोजी कोंडदेवांचा मृत्यू झाला.

तोरणा हा किल्ला समुद्रसपाटीपासून ४६०६ फूट उंच होता. किल्ला मजबूत होता.

Scanned with OKEN Scanner

शिवाजीचे सुदैव की हा किल्ला जिंकण्यासाठी शिवाजीला लष्करी शक्तीचा उपयोग करावा लागला नाही. किल्लेदाराशी वाटाघाटी करून १६४६ मध्ये हा किल्ला शिवाजीने जिंकला. काही इतिहासकार शिवाजी महाराजांनी हा किल्ला जिंकून स्वराज्याचे तोरण बांधले असे म्हणतात. तोरणा किल्ल्यात खोदकाम करीत असताना फार मोठे धन-संपत्ती सापडली. त्याचा उपयोग स्वराज्याच्या कामी करता आला.

४) राजगड जिंकला :- तोरणा किल्ल्यापासून ६ मैलांवर असलेला मुरूबगड हा किल्लाही शिवाजी महाराजांनी जिंकला व त्यास राजगड हे नाव दिले. पुढे राजगड ही शिवाजी महाराजांनी आपली राजधानी बनविली. राजगड म्हणजे राजधानीचा गड होय.

५) कोंढाणा जिंकला :- मार्च १६४८ मध्ये कोंढाणा किल्ला जिंकण्यात शिवाजी महाराजांना यश आले. किल्ल्याचा हवालदार अंबर वहाब हा शहाजी राजांच्या विशेष मर्जीतील होता. शिवाजी महाराजांनी त्याला वश करून घेतले. त्यामुळे कोंढाणा किल्ला युद्ध न करताच शिवाजीच्या हाती पडला. हाच किल्ला सिंहगड म्हणून ओळखला जातो.

६) पुरंदर जिंकला :- हा किल्ला पुण्याच्या जहागिरीचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा होता. या किल्ल्याचा किल्लेदार महादजी नीळकंठराव नाईक हा होता. हा किल्लेदार पण शहाजी राजांचा स्नेही होता. महादजी नीळकंठराव नाईक यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या तीन मुलांना शिवाजी महाराजांनी काही गावे इनाम म्हणून दिली. ऑक्टोबर १६४८ मध्ये हा किल्ला शिवाजी महाराजांनी जिंकला होता.

७) चाकण जिंकला :- दळणवळणाच्या दृष्टीने पुण्याजवळच्या चाकण किल्ल्यास महत्त्वाचे स्थान होते. शहाजींना हा किल्ला निजामशहाने जहागीर म्हणून दिला होता. या किल्ल्याची व्यवस्था दादोजी कोंडदेव यांनी फिरंगोजी नरसाळा यांच्याकडे सोपविली होती. पण तो स्वतंत्रपणे वागत असे. शिवाजी राजे यांनी फिरंगोजी नरसाळा याला आपलेसे करून घेतले. तो शेवटपर्यंत शिवाजी महाराजांशी एकनिष्ठ राहिला.

८) शिवनेरी जिंकला :- फिरंगोजी नरसाळा यांच्यामार्फत शिवाजी महाराजांनी शिवनेरीही जिंकला.

९) ठाण्याच्या सुभेदाराचा खजिना लुटला :- ठाण्याचा सुभेदार मौलाना अहमद हा आदिलशहाकडे खजिना नियमितपणे पाठवत असे. शिवाजी महाराजांनी निवडक

Scanned with OKEN Scanner

सोनदेव याने कल्याणच्या सुभेदाराची सुंदर सून शिवाजी महाराजांपुढे उभी केली. त्यावेळी शिवाजी महाराजांनी जे उद्‌गार काढले, "आमची आई इतकी सुंदर असती, तर आम्हीही सुंदर झालो असतो." त्यास ऐतिहासिक पुरावा नाही.

**१०) लोहगड, तिकोना, राजमाची हे किल्ले जिंकले :-** हे सर्व किल्लेही याच सुमारास (१६४७) शिवाजी महाराजांनी जिंकले व स्वराज्यास जोडले.

**११) शहाजी राजे यांना कैद (१६४८) :-** आदिलशहा शिवाजीच्या हालचालींकडे बारकाईने लक्ष ठेवून होता. तिकडे कर्नाटकात शहाजी राजे यांनी आपले राजकीय वर्चस्व- महत्त्व वाढविले होते. कर्नाटकातील संस्थानिक शहाजी राजांच्या तंत्राने चालत असत. आदिलशहाचा वजीर रणदुल्लाखान हा शहाजीचा वैरी होता. शहाजी राजांचा कर्नाटकात वाढत चाललेला प्रभाव त्यास सहन होत नव्हता. रणदुल्लाखानच्या मृत्यूनंतर मुस्तफाखान हा आदिलशाही दरबाराचा वजीर झाला. त्याचेही शहाजीशी पटत नसे. आदिलशहाने कर्नाटक मोहिमेची जबाबदारी मुस्तफाखानवर टाकली. मुस्तफाखानने शहाजी राजास मानसन्मान देऊन बेसावध अवस्थेत ठेवले व २५ जुलै १६४८ रोजी जिंजीजवळ शहाजी राजे बेसावध अवस्थेत असताना रात्रीच्या वेळी त्यांच्या लष्करी छावणीवर हल्ला करून त्यांना अटक केली.

**१२) पुरंदरचे युद्ध - १६४८ :-** मुस्तफाखान व बाजी घोरपडे यांनी शहाजी राजे यांना अटक केल्यानंतर आदिलशहाने फत्तेखान याच्या नेतृत्वाखाली प्रचंड फौज देऊन ऑक्टोबर १६४८ मध्ये शिवाजीच्या छोट्याशा स्वराज्यावर हल्ला करण्यासाठी पाठवले. शिवाजी महाराज आंता दुहेरी संकटात सापडले. शिवाजीराजांनी पुरंदरच्या किल्ल्यावरूनच फत्तेखानाशी युद्ध करण्याचे ठरविले. फत्तेखानजवळ ५००० फौज होती, तर शिवाजीजवळ तरुण मावळे होते. त्यात प्रामुख्याने बाजी पासलकर, पुरंदरकर, शिळमकर देशमुख, बाजी जेधे, बाजी बांदल, गोदाजी जगताप, कावजी मल्हार, भीमाजी वाघ, संभाजी काटे, शिवाजी इंगळे इ. तरुण मंडळी होती. शिवाजीने प्रथम शिवरळ व सुभानमंडळवर हल्ला करून ते जिंकले. या हल्ल्यात किल्लेदार (आदिलशहाकडून नियुक्त) बाळाजी हैबतराव ठार झाला. त्यानंतर शिवाजी महाराजांनी पुरंदरच्या पायथ्याशी फत्तेखानाशी कडवी झुंज दिली. त्यात फत्तेखान पराभूत झाला व आदिलशहाच्या लष्कराने माघार घेतली. तेव्हा त्यांचा पाठलाग करून त्यांना पूर्णपणे पराभूत केले. याच लढाईत सासवडजवळ शिवाजीचा एक सहकारी

Scanned with OKEN Scanner